## नियमित दिवाणी दावा क्र. ७४३/२०२१ मध्ये निशाणी क्र. ३२ कडील अर्जावर आदेश

१) अर्ज वाचला. वादीच्या विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) वादींच्या प्रस्तूत अर्जातील कथनानुसार वादींना उपलब्ध झालेल्या सरनाम्यातील नमुद पत्त्यावर प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना अनेक वेळा दाव्याचे समन्स काढण्यात आले आहेत. परंतु त्यांच्यावर समन्सची बजावणी होत नाही. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचा शोध घेऊनही त्यांचा संपूर्ण पत्ता व त्याबाबतची माहिती वादींना उपलब्ध होत नाही. वादींनी या अर्जात अशी विनंती केली आहे की, सरनाम्यातील दिलेल्या पत्त्यावर समन्स डकवून बजावणी करण्याचा व वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्यावर समन्सची बजावणी करण्याचा आदेश व्हावा.

३) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचे दावा समन्स बेलीफामार्फत बजावणीकरीता पाठविले असता प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचा दिल्या पत्त्यावर आढळ होत नाही अशा शेऱ्यासह दावा समन्स न बजावता परत आले आहे. त्यानंतर वादींच्या विनंती अर्जानुसार प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना आर.पी.ए.डी. ने समन्स काढले आहेत. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना आर.पी.ए.डी. ने पाठविलेले दावा समन्स अपुरा पत्ता अशा शेऱ्यासह परत आले आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्यावर नेहमीच्या पध्दतीने समन्स व नोटीसची बजावणी शक्य होत नाही. वादी क्र. ५ व ६ चे मुखत्यार सतिश मोहन पाटील यांनी या अर्जाच्या पुष्ठ्यर्थ निशाणी क्र. ३३ कडे शपथपत्र दाखल करुन त्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचा शोध घेऊनही त्यांचा संपुर्ण पत्ता व त्याबाबतची माहिती उपलब्ध होत नाही.

अशा परिस्थितीत माझ्या मते वादींनी प्रस्तूत अर्जामध्ये वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्यावर समन्सची बजावणी करण्याबाबत केलेली विनंती समर्थनीय आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादींनी प्रस्तूत अर्जात विनंती केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचे दावा समन्स सातारा जिल्हयात प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक सकाळ किंवा दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात वादींच्या खर्चाने प्रसिद्ध करुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्यावर दाव्याच्या समन्सची बजावणी करण्यात यावी.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.04.07 17:38:31 +0530

दिनांकः– ०७/०४/२०२५ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.